दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 272, Marathi Daily Friday, Date - 01 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २७२ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. ०१ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111


# अनधिकृत पत्राशेडवर महापालिकेची निष्कासनाची कारवाई

## सुमारे ६३ हजार १८४ चौ. फूट अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम निष्कासित

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २६ मधील जगताप डेअरी ते कस्पटे वस्ती दरम्यानच्या २७ तर प्रभाग क्र. २५ मधील वाकड चौक ते भुजबळ चौक १६ अशा एकूण ४३ अनधिकृत पद्धतीने उभारण्यात आलेल्या पत्रा शेडच्या बांधकामांवर आज सकाळी १० वाजल्यापासून व्यापक कारवाई मोहीम राबविण्यात आली. या कारवाई दरम्यान परिसरातील ६३ हजार १८४ चौ. फूट अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकाम असलेल्या ४३ पत्रा शेडवर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. संबधित अनधिकृत पत्राशेड धारकांना देण्यात आलेल्या नोटीस नुसार सदर कारवाई करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तर ड क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी कारवाई वेळी सह शहर अभियंता सुनिल भागवानी, मुख्यालय अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घारगे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, किशोर ननवरे आणि पूजा दूधनाळे यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या कारवाईत बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, विजयकुमार सोनवणे, ड क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य अभियंता सुनील शिंदे तसेच उप अभियंता संजय चव्हाण, संजय बंडगर, श्याम गर्गे, विनायक माने, संदीप वैद्य हे सहभागी झाले होते.



या कारवाईदरम्यान महानगरपालिकेचे धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक असे १५० अधिकारी व कर्मचारी, २४ पोलीस अधिकारी, ९० पोलीस कर्मचारी आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १२० जवान, ६० मजूर, उपस्थित होते. तर अतिक्रमण हटविण्यासाठी २ ट्रक्टर ट्रोली, १६ जेसीबीचां वापर करण्यात आला. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशमन दलाची एक गाडी आणि दोन म्बुलन्स घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवून नागरिकांना सुरक्षित आणि नियोजनबद्ध शहरी सुविधा उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. तसेच शहरातील कोणतेही अनधिकृत बांधकाम सहन केले जाणार नाही. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल. असे देखील प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित, नियोजनबद्ध नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. नियमबाह्य बांधकामांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. संबंधितांनी नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असून अन्यथा अशा बांधकामांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. 'ड' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत सुरू असलेली ही कारवाई पुढील काही दिवस सातत्याने सुरू राहणार आहे. असे डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी म्हटले.

## कॅन्सर हॉस्पिटलचा सभापती अभिषेक बारणे यांनी घेतला आढावा

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकातील रुग्णांना कर्करोगावर सुलभ आणि परवडणाऱ्या दरात उपचार उपलब्ध करून देण्यासाठी थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने भव्य कॅन्सर हॉस्पिटल उभारण्यात येत आहे. या हॉस्पिटलच्या उभारणीचा आणि विविध सुविधांचा आढावा घेण्यासाठी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज, ३० एप्रिल रोजी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. या पाहणी दौऱ्यादरम्यान अभिषेक बारणे यांनी हॉस्पिटल परिसरातील पार्किंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था, ऑक्सिजन आणि पाणी पुरवठा यंत्रणा, तसेच स्वच्छतेच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. रुग्णालयात पुरवल्या जाणाऱ्या संभाव्य आरोग्य सेवांची माहिती घेत असताना त्यांनी कामाचा दर्जा आणि गती याबाबत प्रशासनाला आवश्यक सूचनाही केल्या.

यावेळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. मुसलगी, डॉ. सोनेकर, डॉ. कुलकर्णी यांसह पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. हे रुग्णालय जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असणार आहे. यामध्ये लिनियर क्सिलरेटर, ब्रॅकीथेरपी युनिट्स आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारखी महागडी यंत्रसामग्री बसवण्यात येणार आहे. येथे प्रामुख्याने स्तनाचा, फुफ्फुसाचा, कोलोरेक्टल, प्रोस्टेट आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावर विशेष उपचार केले जातील. तसेच केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, शस्त्रक्रिया, समुपदेशन आणि



पुनर्वसन या सेवा एकाच छताखाली मिळतील. विशेष म्हणजे, येथील उपचारांचे शुल्क 'महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना' आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनांशी सुसंगत ठेवले जाणार असल्याने गरिबांसाठी हे उपचार अत्यंत स्वस्त किंवा मोफत ठरणार आहेत. या दौऱ्याचे औचित्य साधून अभिषेक बारणे यांच्या हस्ते थेरगाव हॉस्पिटलमध्ये अनेक वर्षे आपली निष्कलंक सेवा देणारे ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र फिरके यांचा सेवानिवृत्तीनिमित्त विशेष गौरव करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. थेरगावमधील या नवीन प्रकल्पामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कर्करोग रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कर्करोगासारख्या गंभीर आजाराचा उपचार हा अत्यंत खर्चिक असतो, जो सामान्यांच्या आवाक्याबाहेर जातो. त्यामुळेच थेरगाव येथे महानगरपालिकेच्या वतीने हे अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभारले जात आहे. या रुग्णालयामध्ये आम्ही लिनियर क्सिलरेटर आणि पीईटी-सीटी स्कॅनर यांसारख्या जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देत आहोत. महत्त्वाचे म्हणजे, हे उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी जोडले जाणार असल्याने गोरगरीब रुग्णांना येथे मोफत किंवा अत्यंत अल्प दरात सेवा मिळेल.

शहरातील एकाही रुग्णाला पैशाअभावी उपचारांपासून वंचित राहावे लागू नये, हेच आमचे उद्दिष्ट आहे.

## नाशिक हादरलं! अध्यक्षांच्या बनावट सहीने वर्क ऑर्डर जारी

**नाशिक । प्रतिनिधी**




कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्ष यांच्या बनावट सहीने तब्बल ७० कोटी रुपयांचे कंत्राट मिळवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कुंभमेळा संदर्भात कामांची वर्क ऑर्डर मिळवण्यासाठी अज्ञाताने कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्षांची बनावट सही वापरून गैरप्रकार केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी नाशिक रोड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात अज्ञाताने बनावट सहीद्वारे ३५ कोटी रुपयांचे दोन वर्क ऑर्डर तयार केल्याची माहिती आहे. मात्र, कुंभमेळा प्राधिकरण अध्यक्ष प्रवीण गेडाम यांना आपली सही नसल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आलाय. सिंहस्थ कामांच्या लगीन घाईत हात मारण्याचा हा प्रयत्न असून या प्रकरणी नाशिक रोड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या प्रकरणाचे गांभीर्य लक्ष्यात घेता पोलिसांकडून या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. मात्र या घटनेने नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# ओबीसींच्या सर्वसमावेशक विकासावर शासनाचा भर - इतर मागास बहुजन विकास मंत्री अतुल सावे

**नांदेड । प्रतिनिधी**

इतर मागास वर्गाच्या (ओबीसी) आणि बहुजन समाजाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. 'ओबीसींचा सर्वसमावेशक विकास करण्यावर शासनाचा विशेष भर' असल्याचे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन विकास, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. नांदेड येथील विष्णू नगर भागातील श्री. शंकरराव चव्हाण सभागृहात इतर बहुजन कल्याण विभागाच्यावतीने आयोजित 'कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्यात' पालकमंत्री सावे अध्यक्षीय पदावरून बोलत होते. या कार्यक्रमास खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार बाबुराव कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, इतर मागास बहूजन कल्याण संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, म.राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. वसंत माने, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलींद नारिंगे, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे संचालक प्रताप पवार, वनार्टीचे संचालक प्रशांत वावगे, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उपसंचालक तेजस माळवदकर, सहाय्यक संचालक सचिन खुने यांच्यासह परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर येथील संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे म्हणाले की, समाजातील तळागाळातील घटकांना आणि विशेषतः ओबीसी प्रवर्गातील तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. महामंडळांच्या माध्यमातून सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आजच्या या कर्ज वाटप मेळाव्याचा लाभ घेऊन तरुणांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा आणि राज्याच्या विकासात आपले योगदान द्यावे. रोजगार मिळविण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा, असे आवाहन मंत्री सावे यांनी केले.

वर्षभरात ७५ विद्यार्थ्यांना जवळपास ६० लक्ष रुपयांपर्यंत परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ६२ जिल्हानिहाय वसतीगृहे उभारले आहेत. यात केवळ मुंबई-पुणे शहरे अपवाद आहेत. या ६२ वसतीगृहामध्ये ३१ मुलीसाठी आणि ३१ मुलांचे वसतीगृहे आहेत. याशिवाय आधार योजनेच्या माध्यमातूनही ओबीसी विद्यार्थ्यांना राहण्याची सोय शासनाकडून करण्यात येत आहेत. स्पर्धात्मक परीक्षेतही विद्यार्थ्यांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे ते म्हणाले. व्हीजेएनटीच्या ९०० आश्रमशाळेतील १०० विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेतून इस्त्रोसारख्या संस्थाना भेट देण्यासाठी शासन पुढाकार घेत असल्याचेही पालकमंत्री श्री. सावे म्हणाले.

या ऐतिहासिक कार्यक्रमात मार्गदर्शन करताना खासदार अशोक चव्हाण म्हणाले, वाढत्या स्पर्धेच्या काळात रोजगार आणि व्यावसायिक गुणवत्तेची गरज अधोरेखित झाली असून, 'विकसित भारत २०४७' चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. उद्योग उभारणीसाठी गरिबांना येणारी 'मार्जिन मनी'ची अडचण सोडवण्यासाठी सध्या १४ महामंडळे कार्यरत आहेत. आता गावागावांत सुविधा केंद्रे सुरू करून नावीन्यपूर्ण व्यवसायांना चालना दिली जात आहे. ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांमधील जवळपास ६११ उपजातींना न्याय देण्याच्या उद्देशाने ३१ मार्च



२०२६ पर्यंत तब्बल ७० हजार पेक्षा जास्त लाभार्थ्यांना कर्जवाटप करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यातील ७० ते ७५ टक्के निधी परतफेड होत असून, हे या योजनेचे मोठे यश असल्याचे त्यांनी सांगितले.

'महाज्योती' व इतर कौशल्य विकास उपक्रमांच्या माध्यमातून आतापर्यंत दोन हजार ३८२ विद्यार्थ्यांची सरकारी नोकरीत निवड झाली आहे, १८ हजार ७७८ विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला आहे आणि २१ हजार ६६० विद्यार्थिनींनी टेलरिंगसारख्या विविध लघु व्यवसायाच्या माध्यमातून स्वतःचा स्वयंरोजगार सुरू केला असल्याची माहिती खासदार अशोक चव्हाण यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणारा हा अत्यंत यशस्वी आणि दिशादर्शक प्रयत्न असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले, या मेळाव्यातून मोठ्याप्रमाणात स्वयंरोजगाराला चालना मिळणार आहे. शासनाच्या या योजनांचा प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेऊन इतर पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना आमदार बाबुराव कोहळीकर यांनी बँकांना आवाहन केले की, त्यांनी शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजना तळागाळातील आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. या कार्यक्रमात लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज कसे भरावेत याबाबतची माहिती पुस्तिका, वनार्टीच्या माहिती पुस्तिका तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाच्या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले यासह कार्यक्रमात विभागाच्यावतीने देण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या.

या मेळाव्यात अनेक गरजू आणि होतकरू लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्जाचे वाटप करण्यात आले. तसेच, पालकमंत्री अतुल सावे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वाहनांच्या ताबा चावीचे वाटप करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. सदर कार्यक्रमाला नांदेड, लातूर, परभणी, धाराशिव आणि हिंगोली जिल्ह्यातील तरुण-तरुणी, विविध योजनांचे लाभार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शासनाच्या या उपक्रमामुळे मराठवाड्यातील स्वयंरोजगाराला मोठी चालना मिळणार असल्याचा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. महापौर कविता मुळे यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने झाली. प्रास्ताविक इतर मागास बहुजन कल्याण विभाग संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू दासरी यांनी केले. व्यवस्थापकीय संचालक प्रताप पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## थोडक्यात...

### जनगणना २०२७ साठी १ मे पासून होणार स्वयं-नोंदणी सुरू

**पिंपरी । प्रतिनिधी**

देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया असलेल्या जनगणना २०२७ प्रक्रियेची पिंपरी चिंचवडमध्ये जोरदार तयारी सुरू झाली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिक, तसेच शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांना या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

यंदा जनगणना प्रक्रियेत अचूक, पारदर्शक व विश्वसनीय माहिती संकलनावर विशेष भर देण्यात येत असून, त्यासाठी स्वयं-नोंदणी (Self Enumeration) या सुविधेला प्राधान्य देण्यात आले आहे. नागरिकांना १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती ऑनलाइन भरता येणार आहे. ही प्रक्रिया सोपी, जलद आणि सुरक्षित असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यानंतर १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरोघरी भेट देऊन प्रत्यक्ष माहिती संकलित करणार आहेत. त्या वेळी प्रगणकांना सहकार्य करावे, असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

जनगणना ही शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. स्वयं-नोंदणीमुळे नागरिकांचा वेळ वाचतो आणि माहिती अधिक अचूकपणे नोंदवता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या सुविधेचा लाभ घ्यावा. नागरिकांचा सक्रीय सहभाग हा शहराच्या भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे आपली जनगणना, आपला विकास या संकल्पनेतून प्रत्येकाने पुढाकार घेत जनगणना प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे मत उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जनगणना २०२७ ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. नागरिकांनी स्वयं-नोंदणीद्वारे पुढाकार घेतला तर माहिती अधिक अचूक आणि विश्वासार्ह मिळेल. प्रत्येक नागरिकाने ही आपली जबाबदारी समजून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मी करतो.असे रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी म्हटले.

पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्यातील नियोजनासाठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. नागरिकांनी जबाबदारीने सहभागी होऊन अचूक माहिती देणे आवश्यक आहे. हीच माहिती शहराच्या विकासाचा मार्ग ठरवणार आहे. असे डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी म्हटले.

स्वयं-नोंदणी ही प्रक्रिया सोपी आणि सुरक्षित आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने माहिती भरून प्रशासनाला सहकार्य करावे.

असे कुलदीप जंगम,अतिरिक्त आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी म्हटले.

## संपादकीय...

### महापालिकेचा कडक बडगा

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ड' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २६ मधील जगताप डेअरी ते कस्पटे वस्ती तसेच प्रभाग क्र. २५ मधील वाकड चौक ते भुजबळ चौक दरम्यान उभारण्यात आलेल्या एकूण ४३ अनधिकृत पत्राशेड बांधकामांवर आज सकाळी १० वाजल्यापासून व्यापक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सुमारे ६३ हजार १८४ चौ. फूट अतिक्रमण हटविण्यात आले. सदर कारवाई नोटीस देऊनही नियमांचे पालन न करणाऱ्या संबंधित धारकांवर करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. 'ड' क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात मोहिम राबविण्यात आली. या कारवाईत सहशहर अभियंता सुनिल भागवानी, उप आयुक्त अतुल पाटील, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घारगे, राजाराम सरगर, अजिंक्य येळे, किशोर ननवरे आणि पूजा दूधनाळे यांच्यासह बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते लक्ष्मीकांत कोल्हे, विजयकुमार सोनवणे तसेच स्थापत्य अभियंता सुनील शिंदे आणि उपअभियंते संजय चव्हाण, संजय बंडगर, श्याम गर्गे, विनायक माने, संदीप वैद्य यांनी सहभाग नोंदवला. मोहीमेदरम्यान १५० महापालिका अधिकारी-कर्मचारी, २४ पोलीस अधिकारी, ९० पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १२० जवान आणि ६० मजूर तैनात होते. अतिक्रमण हटविण्यासाठी १६ जेसीबी, २ ट्रॅक्टर ट्रॉलींचा वापर करण्यात आला. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दलाची एक गाडी व दोन म्बुलन्स घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित व नियोजनबद्ध नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हा या कारवाईचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू राहणार असून नियमबाह्य बांधकामांना कोणतीही मुभा दिली जाणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित, नियोजनबद्ध नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे.

# महाराष्ट्र दिन आणि जालना जिल्ह्याचे पर्यावरणीय वास्तव



१ मे हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाचा मानला जातो. महाराष्ट्र राज्याची स्थापना या ऐतिहासिक घटनेने मराठी अस्मितेला नवे बळ दिले. मात्र, हा दिवस साजरा करताना केवळ उत्सव न करता राज्याच्या विविध भागातील वास्तवाकडे पाहणेही तितकेच गरजेचे आहे. विशेषतः जालना जिल्हा या मराठवाड्यातील जिल्ह्याचे चित्र अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करते.

जालना जिल्ह्यात गेल्या काही वर्षांत पर्यावरणीय समतोल मोठ्या प्रमाणात बिघडताना दिसतो. विकासाच्या नावाखाली होणारी अतिरेकी वृक्षतोड हा त्यातील सर्वात मोठा धोका ठरतो आहे. एकेकाळी हिरवाईने नटलेले भाग आज ओसाड होत चालले आहेत. जंगलांचे क्षेत्र कमी झाल्यामुळे पावसाचे प्रमाण अनियमित झाले असून, त्याचा थेट परिणाम शेतीवर होत आहे.

याशिवाय गौण खनिजांचे - विशेषतः वाळू, दगड आणि मुरूम - मोठ्या प्रमाणावर होत असलेले उत्खनन ही देखील चिंतेची बाब आहे. अनेक ठिकाणी नियमांकडे दुर्लक्ष करून केले जाणारे उत्खनन नैसर्गिक रचनेला हानी पोहोचवत आहे. यामुळे जमिनीची धूप वाढते, पाण्याचे स्रोत नष्ट होतात आणि भविष्यातील पर्यावरणीय संकट अधिक तीव्र बनते.

पाण्याचा प्रश्न तर जालना जिल्ह्याचा कायमचा विषय बनला आहे. भूजल पातळी झपाट्याने खाली जात असून, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे काही वेळा अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते. म्हणजेच, एकीकडे दुष्काळ आणि दुसरीकडे पूर - अशा टोकाच्या परिस्थितींचा सामना जिल्ह्याला करावा लागत आहे.

तापमानवाढ ही आणखी एक गंभीर समस्या बनत आहे. उन्हाळ्यातील तीव्र उकाडा केवळ अस्वस्थता निर्माण करत नाही, तर आरोग्यावरही विपरीत परिणाम करतो. याचा फटका सर्वाधिक गरीब आणि शेतकरी वर्गाला बसतो. शेतीचे उत्पन्न घटते, रोजगाराच्या संधी कमी होतात आणि स्थलांतर वाढते.

या सर्व समस्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे जालना जिल्ह्याचा विकास खुंटल्याचे चित्र दिसते. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. विकास हवा, पण विनाश नको ही भूमिका आता केवळ घोषवाक्य न राहता कृतीत उतरवण्याची वेळ आली आहे. जलसंधारण, वृक्षारोपण, नियंत्रित खनन आणि पर्यावरणपूरक धोरणे यावर भर देऊनच जालना जिल्ह्याला या संकटातून बाहेर काढता येईल. नागरिकांचा सहभाग, प्रशासनाची जबाबदारी आणि जागरूकता या तिन्हींच्या एकत्रित प्रयत्नांतूनच बदल शक्य आहे.

महाराष्ट्र दिन खऱ्या अर्थाने तेव्हाच साजरा होईल, जेव्हा जालना सारखे जिल्हेही विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील आणि निसर्गासोबत समतोल साधत प्रगती करतील.

**दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र**
**संपादक**
**ज्योती आडेकर**

## महाराष्ट्रातील कारागिरांच्या सृजनातून जन्मलेली कोल्हापुरी चप्पल जागतिक लक्झरी उत्पादन बनणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील कारागिरांच्या सृजनातून जन्मलेली कोल्हापुरी चप्पल आज जागतिक लक्झरी उत्पादन बनली असल्याचे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले 'मेड इन इंडिया'ची ताकद महाराष्ट्राने जगासमोर प्रभावीपणे सादर केली आहे.

भारतीय पारंपरिक चर्मकला कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅन्ड प्राडा आणि लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारानुसार कारागिरांच्या कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी प्राडा पुढील तीन वर्षांसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिट्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी (केआयएलटी) येथे प्रशिक्षण कार्यक्रमासाठी संपूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. या माध्यमातून महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कोल्हापुरी चपला बनवणाऱ्या पारंपरिक लेदर कारागिरांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात येणार असून पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या कारागिरीला आधुनिक डिझाइन आणि तांत्रिक कौशल्यांची जोड देण्यावर या कार्यक्रमात भर देण्यात येणार आहे.



पारंपरिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, प्राडा सोबत हा करार केवळ कारागिरांच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारा नाही, तर पिढ्यानढ्या जोपासलेल्या भारतीय सांस्कृतिक परंपरेचा गौरव आहे. एक जागतिक ब्रँड महाराष्ट्रातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे पूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या भागीदारीची संकल्पना, समन्वय आणि अंमलबजावणी लिडकॉमने प्रभावीपणे केली असल्याचे नमूद केले. विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय कायदे, जागतिक संबंध आणि बौद्धिक संपत्ती हक्कांचा विचार करून अत्यंत सूक्ष्म नियोजनातून हा करार करण्यात आला आहे. कारागिरांच्या पिढीजात हक्कांचे संरक्षण हेच आमचे प्रमुख ध्येय होते.

लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, प्राडा सोबत हा करार भारतीय पारंपरिक हस्तकलेसाठी आणि अनेक दशकांपासून या कलेचे संरक्षण करणाऱ्या संस्थेसाठी अभिमानाचा क्षण आहे. प्राडा पुढील तीन वर्षांसाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ३०० कोल्हापुरी कारागिरांना प्रशिक्षण देण्यासाठी पूर्ण निधी उपलब्ध करून देणार आहे. हे प्रशिक्षण नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) आणि कर्नाटक इन्स्टिट्यूट ऑफ लेदर अँड फॅशन टेक्नॉलॉजी येथे दिले जाईल. त्यापैकी सर्वोत्तम ३० कारागिरांना इटलीतील प्राडा अकादमीमध्ये प्रगत प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये डिझाइन, तांत्रिक कौशल्ये, डिजिटल साधने आणि बाजारपेठेतील ट्रेंड्स यांचा समावेश असणार आहे. यामुळे पारंपरिक कौशल्य जपत कारागिरांना आधुनिक बाजारपेठेसाठी सक्षम बनविण्याचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे शतकानुशतके जपल्या गेलेल्या कोल्हापुरी चप्पल परंपरेला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. यामध्ये लिडकॉम या संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका असून, गेल्या पाच दशकांपासून ही संस्था महाराष्ट्रातील चर्मकार आणि लेदर कारागिरांच्या सन्मान, उपजीविका आणि हक्कांच्या संरक्षणासाठी कार्यरत आहे. १ मे १९७४ रोजी सामाजिक न्याय विभागांतर्गत स्थापन झालेल्या लिडकॉमने पारंपरिक लेदर कारागिरीची ओळख जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. कोल्हापुरी चप्पलांना २००९ मध्ये भौगोलिक निर्देशांक (जीआय) दर्जा मिळवून देण्यात संस्थेचा मोठा वाटा आहे. प्राडाच्या स्प्रिंग २०२६ मेन्सवेअर सादरीकरणानंतर या सहकार्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यानंतर प्राडाच्या प्रतिनिधीमंडळाने कोल्हापूरला भेट देत कारागिरांशी संवाद साधला. या चर्चेनंतर मुंबईतील इटलीच्या वाणिज्य दूतावासात लिडकॉम आणि प्राडा यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

## नाथजलचे थंडगार पाणी १५ रुपयांलाच मिळाले पाहिजे!'- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**पुणे । प्रतिनिधी**

उन्हाळ्यात बसस्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना 'नाथजल'चे थंडगार पाणी केवळ १५ रुपयांना मिळाले पाहिजे. किंमत वाढवून विक्री करताना आढळल्यास संबंधितांचा विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला.

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज सकाळी पुणे विभागातील लोणावळा बसस्थानकास भेट देऊन तेथील प्रवासी सेवा-सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रवाशांशी संवाद साधला असता, बसस्थानकावर विक्री होत असलेली 'नाथजल'ची एक लिटरची थंड पाण्याची बाटली २० रुपयांच्या वाढीव दराने विकली जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावर त्यांनी संबंधित विक्रेत्यास स्पष्ट दरफलक लावण्याच्या सूचना देत, पुढे १५ रुपयांची बाटली अधिक दराने विक्री केल्यास विक्री परवाना रद्द केला जाईल, असा इशारा दिला.

तसेच, लोणावळा बसस्थानकावर येणाऱ्या काही बसफेऱ्या बसस्थानकात न येता पुढे जात असल्याची तसेच काही बसेस जाणीवपूर्वक खाजगी हॉटेलांवर थांबत असल्याची तक्रार प्रवाशांनी यावेळी मांडली. या हॉटेलांवरील महागडे खाद्यपदार्थ प्रवाशांना परवडत नसल्यामुळे, वेळापत्रकातील सर्व बसफेऱ्या नाश्त्यासाठी लोणावळा बसस्थानकावरच थांबाव्यात, अशी मागणी प्रवाशांनी केली. त्यानुसार, कोणतीही बस खाजगी हॉटेलांवर न थांबता नियोजित वेळापत्रकानुसार लोणावळा बसस्थानकावरच थांबावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी एसटी प्रशासनाला दिले.

या पाहणीदरम्यान त्यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रवाशांसाठी उपलब्ध सुविधा, तिकीट व्यवस्था तसेच इतर मूलभूत सोयींचा सविस्तर आढावा घेतला. प्रवाशांना अधिक दर्जेदार व सुलभ सेवा मिळावी यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी त्यांनी बसस्थानकातील कर्मचाऱ्यांशी तसेच प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रवासी सेवेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# लाईव्ह इव्हेंट्स परवानगीसाठी 'एक खिडकी' सुविधा; राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील लाईव्ह मनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. लाईव्ह इव्हेंट्स परवानगीसाठी 'एक खिडकी' सुविधा निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भातील सर्वसमावेशक कार्यपद्धतीसह(एसओपी) संपूर्ण कार्यान्वयासाठी समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कार्य करणार आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

लाईव्ह इव्हेंट्स, कॉन्सर्ट आणि विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी लागणाऱ्या अनेक परवानग्या सुलभ करण्याच्या उद्देशाने एक खिडकी सुविधा (डळपसश्रश थळपवेु उश्रशरीरपलश ड्रीेंशा) सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करताना आयोजकांना पोलीस, अग्निशमन, वीज, महापालिका, महसूल, पर्यावरण आदी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागतात. या प्रक्रियेत अधिकचा वेळ लागत असून अनेक प्रकारची कागदपत्रे लागत आहेत. वेळ आणि कागदपत्रांची संख्या कमी करून संपूर्ण प्रक्रियेत एकसूत्रता आणण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यात प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी प्रधान सचिव (माहिती व जनसंपर्क) असणार असून, पोलीस, वाहतूक, महानगरपालिका, अग्निशमन, वीज, आरोग्य, पर्यावरण तसेच इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी सदस्य असतील.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला या प्रक्रियेसाठी समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. राज्यातील सर्व लाईव्ह इव्हेंट्सच्या परवानग्यांसाठी समन्वयाची जबाबदारी ही संस्था पार पाडणार आहे. परवानग्या देण्याची प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी शासनाकडून ऑनलाईन डॅशबोर्ड आणि आयटी प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यकता भासल्यास तांत्रिक मदतीसाठी बाह्यसंस्थेची नियुक्तीही केली जाणार आहे.



भारतातील लाईव्ह मनोरंजन अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासह तिचा विकास करण्यासाठी तसेच भारताला २०३० पर्यंत लाईव्ह मनोरंजन क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अग्रेसर देश बनविण्यासाठी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय स्तरावर 'लाइव्ह इव्हेंट्स डेव्हलपमेंट सेल' २१ ऑक्टोबर २०२५ रोजी स्थापन करण्यात आला. या सेलच्या माध्यमातून देशात सांस्कृतिक, आर्थिक आणि रोजगार क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट आहे.

मुंबईमध्ये पार पडलेल्या वेव्ह्ज परिषद २०२५ मधील चर्चासत्रांतील निर्णय-ठरावांनुसार लाईव्ह इव्हेंट इंडस्ट्री/ कन्सर्ट इकॉनॉमीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रत्येक राज्यात लाईव्ह इव्हेंट डेव्हलपमेंट सेल तयार करण्यात येत आहेत. देशातील लाईव्ह (डळींश) मनोरंजन अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासह विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात देखील कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. लाईव्ह मनोरंजन अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याचा विषय हा राज्य प्रशासनातील विविध विभागांशी संबंधित असल्याने विविध विभागांकडून कालमर्यादेत यासंदर्भातील कार्यवाही करण्यावर भर देण्यात येत आहे.

प्रत्येक राज्याने आपल्या राज्यासाठी लाईव्ह इव्हेंट संदर्भात कार्यवाही करावी असे सूचित केले आहे. राज्यातही यासंदर्भातील काम सुरू आहे. 'लाइव्ह इव्हेंट्स डेव्हलपमेंट सेल'द्वारे तयार करण्यात येणारी प्रमाणित कार्यपद्धती प्राप्त झाल्यानंतर राज्य शासनाच्या गरजेप्रमाणे त्यात बदल करण्यात येणार आहे. केंद्रीय सूचना आणि प्रसारण मंत्रालयाद्वारे लाईव्ह इव्हेंट्सला परवानगी मिळण्याच्या अनुषंगाने खउक (खपींशसीरींशव उश्रशरीपलश र्कील) पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

लाईव्ह इव्हेंट/ कन्सर्ट / कार्यक्रमांच्या परवानग्यांचे समन्वयन आणि इतर अनुषंगिक बाबीच्या नियोजनासाठी केंद्र शासनाच्या मॉडेल लाईव्ह इव्हेंट क्लिअरन्स प्रमाणित कार्यपद्धतीनुसार राज्याकरिता एक प्रभावी व उद्योग पूरक कार्यपद्धती तयार करण्यात येणार आहे. यापुढील काळात महाराष्ट्रासाठी लाईव्ह इव्हेंटच्या परवानगी आणि आवश्यक यंत्रणा उभारण्यासाठी Single Window System Dashboard तयार करण्यात येणार आहे. तसेच 'इज ऑफ डुइंग बिजनेस' अंतर्गत ही प्रणाली काम करणार आहे.

त्यानंतर महाराष्ट्राचा सिंगल विंडो सिस्टिम डॅशबोर्ड खउक ला इंटिग्रेट करण्यात येईल. या निर्णयामुळे लाईव्ह इव्हेंट्स आयोजित करण्याची प्रक्रिया सुलभ, गतिमान होऊन लाईव्ह इव्हेंट्स उद्योग क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. याशिवाय पर्यटन, गुंतवणूक क्षेत्राच्या विकासासह रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार आहे.

## थोडक्यात

### ताराबंदर अनधिकृत कांदळवन कत्तलेवर प्रशासन मौन



**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील ताराबंदर समुद्रकिनारी अनधिकृत भराव आणि कांदळवनाची मोठ्या प्रमाणात पुरती कत्तल सुरू असताना प्रशासनाने पूर्णपणे मौन धरले आहे. याचवेळी पारंपरिक मच्छीमारांना त्यांच्या बोटी हटवण्याचे आणि 'प्रवेश निषिद्ध' फलक लावण्याचे आदेश देऊन वनविभागाच्या कर्मचाऱ्यांकडून धमकावली सुरू आहे. ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लहर उसळली असून, भूमाफियांच्या जाळ्यात प्रशासन अडकल्याचा आरोप होत आहे.

ग्रामस्थांचा तीव्र विरोध आणि वनविभागाची टाळाटाळ

ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे सचिव प्रतीक प्रमोद कणगी यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी नितीन ढगे आणि कर्मचारी अभिजीत पाटील यांच्याशी संपर्क साधला. अभिजीत पाटील यांनी मात्र बोटी हटवण्याचे आदेश वरिष्ठांकडून मिळाल्याचे मान्य केले, पण जेसीबी आणि पोकलेन मशिनद्वारे रात्रीच्या आडोशाला केलेल्या अनधिकृत भरावांवर कारवाईबाबत स्पष्ट उत्तर दिले नाही. ग्रामस्थांनी सांगितले, गट क्रमांक, सीआरझेड (कोस्टल रेग्युलेशन झोन) नियमांची माहिती देण्यासही त्यांनी नकार दिला. हे दुहेरी मापदंड स्पष्टपणे दिसत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, कांदळवनाची कत्तल पर्यावरणाला धोकादायक आहे. हे वन क्षेत्र मच्छीमारांच्या उपजीविकेचा आधार असून, येथील जैवविविधता नष्ट होत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अनेक तक्रारी केल्या असूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. रात्री भराव चालू असताना वनविभागाचे कर्मचारी मच्छीमारांना धमकावतात, पण खऱ्या गुन्हेगारांना सोडून देतात, असे ग्रामस्थांचे मत आहे.

जनतेच्या चर्चेनुसार, राजकीय पुढाऱ्यांचा आणि श्रीमंत धनदांडग्यांचा मेळ घातला असून, येथे जेट्टी बांधण्याचा घाट घालण्यात आला आहे. या जेट्टीमधून डिझेल, वाळू आणि गावठी दारू यांची तस्करी होणार असल्याचा संशय ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. हे अनधिकृत कामे भूमाफियांच्या फायद्यासाठी सुरू आहेत. मच्छीमारांच्या पिढ्यानपिढ्या चाललेल्या समुद्री उपजीविकेवर हा थेट हल्ला आहे, असे स्थानिक मच्छीमार नेते म्हणाले. ताराबंदर परिसर हा पारंपरिक मासेमारीचा केंद्रबिंदू आहे. येथील ५० हून अधिक कुटुंबे केवळ मासेमारीवर अवलंबून आहेत. अनधिकृत भरावांमुळे समुद्रकिनारा अरुंद होत असून, मासे पकडण्याची जागा कमी होत आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, हे कामे कायद्याने बंद असले तरी पैशाच्या जोरावर सुरू आहेत.

प्रतीक कणगींची ठणकावून इशारा; केंद्र-राज्य सरकारकडे अपेक्षा

प्रतीक कणगी यांनी स्पष्टपणे सांगितले, लेखी आदेशाशिवाय मच्छीमारांचे हक्क हिरावले तर आम्ही उच्च अधिकाऱ्यांपर्यंत, जिल्हाधिकारी, वन विभागाचे मुख्य वनसंरक्षक आणि पर्यावरण मंत्रालयापर्यंत प्रकरण घेऊन जाणार. ग्रामस्थ मंडळाने केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारकडे भूमाफियांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

ग्रामस्थ मंडळाने आता केंद्र आणि राज्य विभागांकडे तक्रार दाखल करण्याची तयारी केली असून, अनधिकृत धंद्यांवर आळा घालण्यासाठी आंदोलनाची हाक दिली आहे. मच्छीमार हक्क अबाधित ठेवण्यासाठी लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई करून कांदळवन संरक्षण आणि मच्छीमारांच्या हक्कांचे रक्षण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# 'मी रमाई' या एकपात्री नाट्यप्रयोगातून रमाईंच्या त्यागमय जीवनाला भावपूर्ण अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

त्याग, संघर्ष आणि समर्पणाच्या असामान्य जीवनप्रवासाला रंगमंचावरून सजीव रूप देणारा 'मी रमाई' हा एकपात्री नाट्यप्रयोग पिंपरी चिंचवडकरांसाठी एक हृदयस्पर्शी आणि विचारप्रवर्तक अनुभव ठरला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथे उभारण्यात येणाऱ्या 'त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी' प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमाचे औचित्य साधून सायंकाळी मराठी अभिनेत्री प्रियांका उबाळे यांच्या प्रभावी सादरीकरणातून रमाईंच्या जीवनातील अदृश्य पण महान संघर्ष प्रेक्षकांसमोर उलगडला.

पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक (भीमसृष्टी) जवळील मोकळ्या जागेत आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रस्तावित सृष्टी प्रकल्पाच्या माध्यमातून रमाईंच्या कार्याची आणि त्यागाची स्मृती जपण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होत असताना, 'मी रमाई' या नाट्यप्रयोगाने त्या संकल्पनेला भावनिक अधोरेखित केले.

या एकपात्री नाट्यप्रयोगामध्ये रमाईंच्या आयुष्याचा संपूर्ण पट अत्यंत प्रभावी शैलीत मांडण्यात आला. लहानपणातील गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि बालवयात आलेल्या जबाबदाऱ्या यांचे चित्रण करताना समाजातील कठोर वास्तवाची जाणीव प्रेक्षकांना झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विवाहानंतरच्या कठीण आयुष्याचा प्रवास, आर्थिक संकटे आणि संसारातील संघर्ष यांचे वास्तववादी सादरीकरण मन हेलावून टाकणारे होते.



नाट्यप्रयोगातील सर्वाधिक परिणामकारक भाग म्हणजे रमाईंच्या त्यागाची जाणीव करून देणारे प्रसंग. डॉ. बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत असताना रमाईंची एकटेपणाशी चाललेली झुंज, मुलांच्या मृत्यूचे दुःख सहन करतानाही न डगमगणारी मानसिक ताकद आणि तुम्ही शिकत राहा, मी सगळं सहन करते हा तिचा निश्चय प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा ठरला.

याचबरोबर समाजातील अस्पृश्यतेचे अनुभव, बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीत रमाईंची अप्रत्यक्ष पण अत्यंत महत्त्वाची साथ यांचे प्रभावी चित्रण या प्रयोगात करण्यात आले. आपल्या वैयक्तिक वेदना बाजूला ठेवून समाजासाठी कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेले मानसिक बळ हे रमाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य अधोरेखित करणारे ठरले. नाट्यप्रयोगाच्या शेवटी रमाईंच्या आजारपणाचा आणि त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या टप्प्याचा भावनिक आविष्कार सादर करताना प्रेक्षक स्तब्ध झाले होते. महापुरुष घडवणारी शक्ती कोण? हा प्रश्न उपस्थित करत समाजातील स्त्रियांच्या अदृश्य योगदानाची जाणीव करून देणारा संदेश या प्रयोगातून देण्यात आला. प्रियांका उबाळे यांनी एकहाती साकारलेला हा नाट्यप्रयोग प्रेक्षकांना केवळ भावनिक पातळीवर स्पर्श करून गेला नाही, तर सामाजिक भानही अधिक तीव्र करून गेला. प्रस्तावित 'रमाई सृष्टी' प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर हा प्रयोग आयोजित करून महानगरपालिकेने इतिहासातील एका महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या योगदानाला उजाळा देण्यात आला.

या नाट्यप्रयोगास नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या माध्यमातून रमाईंच्या त्यागमय जीवनाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला.

## महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन म्हणजे सेवा, साधेपणा आणि समाजजागृती यांचा आदर्श आहे, त्यांनी दिलेला स्वच्छता, श्रमसंस्कार आणि एकात्मतेचा संदेश आजच्या काळातही महत्त्वाचा ठरतो असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कार्यकारी अभियंता सुनीलदत्त नरोटे, सुनील पवार, सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने, कामगार नेते नागेश जाधव आदी उपस्थित होते.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील एक थोर संत, समाजसुधारक आणि राष्ट्रभक्त होते. त्यांनी कीर्तन, भजन या माध्यमातून समाजजागृती केली. त्यांनी 'ग्रामगीता' सारख्या ग्रंथातून आदर्श ग्रामविकास, स्वच्छता, श्रमसंस्कार आणि नैतिक जीवनाचा संदेश दिला. स्वातंत्र्य चळवळीतही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि देशभक्तीची भावना जनमानसात रुजवली. त्यांचे संपूर्ण आयुष्य समाजप्रबोधन, स्वावलंबन आणि मानवतेच्या मूल्यांसाठी समर्पित होते. त्यामुळेच त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी बहाल करण्यात आली.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून महाराष्ट्र दिन तसेच मराठी राजभाषा दिनानिमित्त 'जाणता राजा' या महानाट्याचे आयोजन

**पिंपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य स्थापना दिन तसेच मराठी राजभाषा दिनानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी भव्य सांस्कृतिक मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र कीर्ती सोहळा प्रतिष्ठान आयोजित आणि पद्मभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित आशिया खंडातील पहिल्या क्रमांकाचे ऐतिहासिक महानाट्य 'जाणता राजा' सादर करण्यात येणार आहे. निगडी, सेक्टर २५ येथील मदनलाल धिंग्रा मैदानात 'जाणता राजा' हे महानाट्य दि. १ मे २०२६ (शुक्रवार) रोजी सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, हे महानाट्य सर्वांसाठी विनामूल्य असून सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक नाट्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर रवि लांडगे असणार आहेत.

याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, महेश लांडगे यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी याशिवाय शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया गटनेते कुणाल वाव्हळकर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे

, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, माजी उपमहापौर तथा नगर सदस्य राजू मिसाळ, शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी माहिती देताना महापौर रवि लांडगे म्हणाले, महाराष्ट्र दिनी या महानाट्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांचा जाज्वल्य इतिहास ठेवण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे शौर्य व कार्यापासून प्रेरणा घेवून या पिढीने कार्य करावे यासाठी या नाट्यप्रयोगाचे आयोजन केले आहे.

## सेल्फीपासून अत्याचारापर्यंत कोल्हापुरातील आरोपीचे धक्कादायक कृत्य उघड

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील पुलाची शिरोली गावातील अत्याचार प्रकरणात मुख्य आरोपी शाहिद सनदे याच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. २०२२ साली शाहिदने आणखी एका महिलेवर अत्याचार केल्याची तक्रार पुढे आली असून, या प्रकरणी कोल्हापूर शहरातील पोलीस ठाण्यात त्याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल होणार आहे. दरम्यान, या प्रकरणात शाहिदचा जवळचा मित्र शाहरुख देसाई यालाही कोल्हापूर पोलिसांनी

कराड येथून ताब्यात घेतले आहे. तपासादरम्यान शाहिद सनदे याने दोन ते तीन वेगवेगळ्या ठिकाणी पीडित तरुणींवर अत्याचार केल्याचेही समोर आले आहे. शाहिद आणि शाहरुख हे दोघेही एकमेकांचे निकटचे मित्र असल्याने या प्रकरणातील गुंतागुंत वाढली आहे. कोल्हापुरातील लैंगिक अत्याचार प्रकरणातील संशयित आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. आज दोघांनाही



वडगाव कोर्टात हजर केले होते. शाहिद सनदे आणि शाहरुख देसाई या दोघांनाही कोर्टात हजर केले होते. शाहिद सनदे याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. या सगळ्या प्रकरणाचा सखोल तपासासाठी सहा दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीत म्हटलंय की, बहिणीच्या मैत्रिणीसोबत शाहिदने सगळ्यात आधी जवळीक साधली. महाविद्यालयात कार्यक्रमाच्या दरम्यान सगळ्यात आधी पीडित मुलीसोबत सेल्फी घेतला. त्या फोटोचा फायदा घेत शाहिदने पीडित मुलीला आपल्यासोबत बोलण्यास भाग पाडले. इतकच नाही तर सेल्फी फोटोची भीती घालत शरीर सुखाची मागणी केली. आरोपी शाहीदने दोन ते तीन वेळा पीडित मुलीवर अनेक आलिशान हॉटेलवर अत्याचार केले आणि व्हिडिओ बनवले. त्याच व्हिडिओचा गैरवापर करत वारंवार पीडित मुलीकडे शरीर सुखाची मागणी केली.

इतकच नाही तर पीडित तरुणीला शाकाहारी असताना मांसाहार करण्यास जबरदस्ती देखील तो करत होता. मात्र पीडित मुलीने मांसाहार करण्यास दिला नकार, आमचा धर्म चांगला आहे असंही शाहिद सनदे याने पीडित तरुणीला समजावले असल्याचे पिडीत तरूणीने तक्रारीत म्हहटलं आहे.

तपास पूर्ण व्हायचा असल्याने कोल्हापूर पोलिसांनी शाहिद सनदे याची पोलीस कस्टडी वाढवून घेतली. शाहिद सनदे याच्या मोबाईल मध्ये असलेले व्हिडिओ त्याचा मित्र शाहरुख देसाई याने मागितले. या आधारावर दोघांची चौकशी करण्यासाठी दोघांचीही कस्टडी हवी असल्याचे पोलिसांनी कोर्टासमोर मांडले. पोलिसांच्या विनंतीनुसार कोर्टाने दोन्ही आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## अचानक लागलेल्या आगीत आमखेडा येथील अंजनाई गोशाळेचा चारा व साहित्य जळून खाक



**सोयगाव । प्रतिनिधी**

सोयगाव तालुक्यातील आमखेडा येथील क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा संचालित अंजनाई गोशाळेतील चाऱ्याला अचानक लागलेल्या आगीत ३० क्विंटल चारा व गुरांना चारा खाऊ घालण्यासाठी घेतलेले ३० कॅरेट या आगीत भस्मसात झाल्याने गोशाळेचे सव्वा लाख रुपये पर्यंत नुकसान झाल्याची घटना दि.२८ मंगळवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास घडली. गुरे बाजूला चरत असल्याने मोठी जीवित हानी टळली.

याबाबत सविस्तर माहिती अशी, क्रांती जनहित बहुउद्देशीय विकास संस्था आमखेडा संचालित अंजनाई गोशाळेतील चाऱ्याला दि.२८ मंगळवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याने मोठी धावपळ उडाली होती. आग विझविण्यासाठी ज्ञानेश्वर गाडेकर,अनिल लोखंडे, रामेश्वर बोडखे, एकनाथ ठोंबरे,पवन आगे, ज्ञानेश्वर जाधव, संदीप इंगळे,दिलीप शिंदे आदींनी शर्यतीचे प्रयत्न केले.मात्र हवा जास्त असल्याने पाच तासांच्या अथक शर्यतीनंतर रात्री आग आटोक्यात आणण्यात यश आले.

मात्र तो पर्यंत गोशाळेतील ३० क्विंटल चारा व गुरांना चारा खाऊ घालण्यासाठी घेतलेले ३० कॅरेट जळून खाक झाली.यामुळे गोशाळेचे सव्वा लाख रुपये पर्यंत नुकसान झाले आहे. गुरे बाजूच्या शेतात चरत असल्याने सुदैवाने मोठी जीवित हानी टळली.

दरम्यान ग्राम महसूल अधिकारी महेंद्र वारकड यांनी बुधवारी जायमोक्यावर जाऊन घटनेचा पंचनामा करून अहवाल तहसील कार्यालयात सादर केला आहे.

# लग्नाला नकार दिल्याचा राग; विरारमध्ये मायलेकीचा खून, आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न

**मुंबई । प्रतिनिधी**

विरारमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. विरार पश्चिमेतील न्यू विवा कॉलेज परिसरातील पूनम आकांक्षा इमारतीत लग्नाला नकार दिल्याच्या रागातून एका तरुणाने आपल्या प्रेयसीसह तिच्या आईची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आरोपीने स्वतःही आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना आज दुपारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, भाड्याने राहत असलेल्या नॅन्सी मिश्रा (वय २४) आणि तिची आई सरिता मिश्रा (वय ४५) यांच्यावर आज सकाळी सुमारे साडेअकरा वाजण्याच्या सुमारास धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात मायलेकीचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणातील आरोपी शिवम उपाध्याय (वय २५) याने घरात घुसून तोडफोड करत नॅन्सी आणि तिच्या आईवर हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. हल्ल्यानंतर आरोपीने स्वतःचाही जीव संपवण्याचा प्रयत्न केल्याचे समजते. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी संजीवनी रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असून, त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, मागील दोन वर्षांपासून आरोपी शिवम आणि नॅन्सी यांच्यात प्रेमसंबंध होते. या नात्याला लग्नाचे स्वरूप देण्यासाठी आरोपी काल रात्री आपल्या नातेवाईकांसह नॅन्सीच्या घरी गेला होता. मात्र, या विवाहाला नॅन्सीच्या आईने विरोध दर्शविला आणि नॅन्सीनेही लग्नास नकार दिला. याच रागातून संतप्त झालेल्या आरोपीने आज दुपारी साडेबाराच्या सुमारास धारदार हत्यार घेऊन नॅन्सीच्या घरात प्रवेश केला आणि नॅन्सी व तिच्या आईवर सपासप वार करत त्यांची हत्या केली. त्यानंतर स्वतःच्या गळ्यावर ब्लेडने वार करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. घरातून आरडाओरडा ऐकून शेजाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तिघेही रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसताच पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच बोलींज पोलीस ठाणेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या



प्रकरणी दुहेरी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात एकतर्फी प्रेमातून हा हल्ला झाल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली होती. घटनेची माहिती मिळताच बोलींज पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करुन दोन्ही मृतदेह पुढील तपासासाठी शवविच्छेदनास पाठवले असून या दुहेरी हत्येमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे विरार परिसरात एकच खळबळ उडाली असून बोलींज पोलीस पुढील तपास करत आहेत.

डोंबिवली जवळील घारीवली गावातील घटना जुन्या वादातून एका तरुणावर आणि त्याला वाचवण्यासाठी आलेल्या वडिलांवर लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घारीवली गावात घडली आहे. या हल्ल्यात वडील बामा जाधव यांचा जागीच मृत्यू झाला असून, मानपाडा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. जाधव यांचे कुटुंब रात्री घरी जेवण करत असताना अचानक १० ते १२ जणांच्या जमावाने त्यांचा भाऊ दिनेश याला घराबाहेर बोलावले. काहीही समजण्यापूर्वीच जमावाने दिनेशला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी धावून गेलेले वडील बामा जाधव यांच्यावर आरोपींनी लोखंडी रॉडने हल्ला केला, या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

## संक्षिप्त

### मद्यधुंद पोलिस कर्मचारी संजय जगतापची बेदरकार गाडी

**रायगड । प्रतिनिधी**

गोकुळेश्वर स्टॉप येथे मंगळवारी (दि. २८ एप्रिल) रात्री ८.४५ वाजता संजय रमेश जगताप (रा. अलिबाग) यांच्या मद्यधुंद मारुती वेगनार कारने राँग साईडने पिकअप आणि स्कुटीला धडक दिली. अलिबाग पोलिस विभागात कार्यरत आणि मुख्यालयात नियुक्त असलेल्या जगताप यांच्या या बेदरकार वाहन चालवणुकीमुळे साखळी अपघात झाला.

या अपघातात पिकअपमधील मयंक हसमुख काराणी (३२, रा. शेखाचेगाव), धीरज शहा आणि स्कुटीवरील व्यक्ती जखमी झाले. तिघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तिन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. वाहतूक विस्कळीत झाली होती. जगताप यांच्या रेवदंडा पोलिस स्टेशनमधील कारकिर्दीवर गावठी दारू, गांजा, मटका, पत्त्याच्या क्लबमधून हफ्तावसुलीचे गंभीर आरोप आहेत. पैशासाठी त्रास, जमीनजुमला आणि पैसे खाण्याच्या तक्रारी विविध स्टेशनांमध्ये आहेत. मोबाईल रेकॉर्ड, बँक बॅलन्स तपासले तर काळेपणा बाहेर येईल अशी जनतेमध्ये जोरदार चर्चा होत आहे.अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असला तरी अटक नाही. रायगड एसपी आँचल दलाल यांच्याकडून पारदर्शक तपास, बँक-मोबाईल तपासणी आणि कठोर कारवाईची अपेक्षा. अन्यथा पोलिस दलाची प्रतिमा धुळीला मिळेल, जनता संतापली.

### रेवदंडा आंग्रेनगरमध्ये साईबाबा उत्सव: धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक सेवेचा अनोखा संगम

**रायगड । प्रतिनिधी**

रेवदंडा आंग्रेनगरमधील साईबाबा उत्सव मंडळाने यंदाही भक्ती, भजन आणि सामाजिक सेवेचा अनुपम उत्सव साजरा केला. हा उत्सव केवळ धार्मिक सोहळा नसून, स्थानिक लोकांना एकत्र आणणारा सामाजिक एकोप्याचा प्रतीक ठरला. मंडळाचे अध्यक्ष अनिल चेवले, खजिनदार रोशन झावरे, सचिव संजय झावरे आणि उपाध्यक्ष दुष्यंत झावरे यांच्या नेतृत्वाखालील या उत्सवाने गोरगरीबांना आधार देण्यापासून लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यापर्यंत सर्वांगीण योगदान दिले. विशेषतः दुष्यंत झावरे यांचे निस्वार्थी सामाजिक कार्य यामुळे चर्चेत आहे.

दुष्यंत झावरे हे आंग्रेनगरचे खरे 'जनसामान्यांचे भाऊ' म्हणून ओळखले जातात. सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ख्याती आहे की, ते नेहमीच गरजवंतांच्या मदतीला रात्री-अपरात्री धावून येतात. वादळी वारा, जोरदार पाऊस किंवा इतर संकटकाळी ते गोरगरीबांच्या घरबोल्यात पोहोचतात आणि तात्काळ मदत पुरवतात. साईबाबा उत्सवाच्या निमित्ताने त्यांनी साईबाबा चरणी नतमस्तक होऊन आंग्रेनगर आणि आजूबाजूच्या सर्व जनतेचे रक्षण करण्याची प्रार्थना केली. साईबाबा चरणी आम्ही गाऱ्हाणे मांडली, की हे संपूर्ण क्षेत्र वादळ, पावसापासून आणि येणाऱ्या संकटांपासून सुरक्षित राहो, असे दुष्यंत झावरे यांनी सांगितले. ही प्रार्थना केवळ वैयक्तिक नसून, संपूर्ण समुदायाच्या हिताची आहे, जे त्यांच्या व्यापक विचारसरणीचे दर्शन घडवते.

उत्सवात महाप्रसाद वितरण हा प्रमुख आकर्षणाचा ठरला. शेकडो भक्तांना साईबाबा प्रसाद मिळाला, ज्यामुळे लहान-मोठे सर्वजण एकत्र जमले. या उत्सवाला रायगड जिल्हा परिषद सदस्य दिलीप उर्फ छोटम शेठ भोईर, रायगड जिल्हा परिषद सदस्य सचिन राऊळ, ग्रामपंचायत सदस्य राजन वाडकर, नारायण पाटील, ड रोहित भोईर, टिनू भोईर वैगरे प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाला तेज दिले. लहान मुलांसाठी विशेष 'रेकॉर्ड डान्स' स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यात स्थानिक बच्चे कंपनीने आपल्या नृत्यकलेने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. हे उपक्रम स्थानिक कलागुणांना प्रोत्साहन देणारे ठरले. आम्ही नेहमीच असे कार्यक्रम आयोजित करतो जे समुदायाला एकत्र आणतात आणि लहान मुलांना व्यसनांपासून दूर ठेवतात, असे मंडळाचे अध्यक्ष अनिल चेवले यांनी सांगितले. सचिव संजय झावरे आणि खजिनदार रोशन झावरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे उत्सव यशस्वी झाला.

# जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२६ चा समारोप

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जल व्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२६ या उपक्रमाचा जिल्हास्तरीय समारोप सोहळा आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमास खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश गुजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी खासदार डॉ. काळे यांनी, जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करत, अशा उपक्रमांमुळे ग्रामीण भागात शाश्वत विकासाला चालना मिळत असल्याचे सांगितले. तसेच जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढविण्यावर भर देत, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. जलस्रोतांचे जतन, पाण्याचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी पाणी संवर्धनाचे महत्त्व सांगुन, पाणीटंचाई टाळण्यासाठी जलस्रोतांचे संवर्धन आणि प्रभावी व्यवस्थापन अत्यावश्यक आहे.



प्रशासनासोबतच नागरिकांनीही पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.

पंधरवड्याच्या कालावधीत जिल्हाभरात जलस्रोतांची स्वच्छता, गाळ काढणे, नाला खोलीकरण, बंधारे दुरुस्ती, वृक्षारोपण आणि पाणी अडवा-पाणी जिरवा या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात आले. शासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

या उपक्रमांमुळे जलसाठ्यात वाढ होण्यास मदत झाली असून, पाणी व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण झाली आहे. कार्यक्रमाच्या शेवटी जलसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सत्कार करण्यात आला. हा पंधरवडा जिल्ह्यात जलसाक्षरता वाढविण्यास आणि पाणी बचतीच्या चळवळीला बळ देण्यासाठी प्रभावी ठरल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी बांधव, जिल्ह्यातील जलदूत व दोन्ही पाटबंधारे विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्यामध्ये पाटबंधारे विभागामार्फत पाणीबचत, जलसंवर्धन, शेतकरी/पाणी वापर संवाद, भूसंपादन व पुनर्वसन अडचणी निराकरण , जल लेखापरीक्षण इत्यादी विषयावर प्रबोधन करण्यात आले. यासोबतच ग्रामपंचायत चावडी, शाळा, बस स्थानके, इत्यादी ठिकाणी जल प्रतिज्ञा व पथनाट्याद्वारे जलजागृती करण्यात आली. जालना पाटबंधारे विभागामार्फत आयोजित सर्व कार्यक्रमास नागरिक , शेतकरी यांचा सहभाग लाभला तसेच इतर विभागांचा सहकार्य लाभले. यावेळी कार्यक्रमास नागरिक, विविध विभागातील अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जिल्हास्तरीय जलप्रेमी तथा अशासकीय सदस्य एम.डी.सरोदे, जलप्रेमी ज्योती आडेकर मॅडम, जलप्रेमी श्रीमती विद्याताई जाधव, जलप्रेमी गजानन गाढे सर, जलप्रेमी श्रीमती मोहिनी मानकर मॅडम, जलदूत सय्यद सर, जलदूत समाधान खरात सर, जलदूत विनोद काळे सर, जलदूत वसंत काळवणे. असे जलदूत विष्णू पिवळ सर यांनी म्हटले.

## रोटरी रेनबोकडून अंबड माहेश्वरी समाजाकडे शीतशवपेटी सुपूर्द

**जालना । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबो आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या संयुक्त विद्यमाने सामाजिक जबाबदारीचे भान राखत अंबड येथील माहेश्वरी समाजाला 'शीतशवपेटी' (मर्च्युरी फ्रीजर बॉक्स) सुपूर्द करण्यात आली.

जालना येथील ओम साई राम स्टीलच्या सीएसआर फंडातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या या शीतशवपेटीचा लोकार्पण सोहळा २६ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या विशेष पुढाकारातून आणि संकल्पनेतून हा प्रकल्प साकार झाला आहे. समाजातील अंतीम प्रवासावेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी जालना व परिसरातील गरजा लक्षात घेऊन ओम साई राम स्टीलचे राजेश भारुका व त्यांच्या परिवाराने मोलाचे योगदान दिले. या उपक्रमामुळे अंबड परिसरातील नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

या कार्यक्रमाला लप्रांतपाल श्री. सुधीर लातुरे, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, ओम साई राम कंपनीचे राजेश




भारुका, दिनेश भारुका, संतोष भारुका, सौ. रेणुका भारुका सौ. निर्मला साबू, बंडूभाऊ मिश्रीकोटकर, अनुप करवा, रोटरी रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्डा, ऋषिकेश गेंडा, श्री. सोमानी, राजेश मुंदडा, विवेक गिल, डॉ. नितीन खंडेलवाल, विवेक मणियार, सुमित्रा गादिया, विजय राठी, उमेश बजाज आणि रोटरी रेनबोचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, रोटरी ही केवळ एक संघटना नसून ती सेवा देण्याचे एक माध्यम आहे. अनेकदा ग्रामीण भागात किंवा शहरातही दुःखद प्रसंगी पार्थिव जतन करण्यासाठी शीतशवपेटीची निकड भासते. ही गरज ओळखून आम्ही हा प्रकल्प हाती घेतला.

ओम साई राम स्टीलने आपल्या सामाजिक जबाबदारीतून दिलेला हा निधी समाजाच्या खऱ्या उपयोगात येणार आहे, याचा आम्हाला आनंद आहे. माहेश्वरी समाज अंबड यांच्या माध्यमातून ही पेटी सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध राहील. समाजातील प्रत्येक घटकाला कठीण काळात आधार देणे हेच रोटरीचे मुख्य ध्येय आहे आणि भविष्यातही अशाच प्रकारचे जनहिताचे प्रकल्प आम्ही राबवत राहू, असे ते म्हणाले.

## पुर्णवादी नागरिक सहकारी बँकेची फसवणुक करणारा मुख्य सुत्रधार आरोपी शिरीष देवळे अटक

**जालना । प्रतिनिधी**

पुर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे शाखा अधिकारी व पंचमुखी वेअरहाऊसचे मालक यांनी संगणमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊस च्या नावे १६६ बनावट खातेदारांच्या माध्यमातुन ८ कोटी १२ लाख ९३ हजार रुपयांची फसवणूक केल्या बाबत बॅकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुर्णवादी नागरिक सहकारी बँक यांचे फिर्यादवरुन कदीम जालना पोलीस स्टेशन येथे नमूद प्रकरणात गु.र.नं. ४६५/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२),३(५) इछड २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे सदर बँकेमध्ये अपहार झाल्याने व सदर अपहाराची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याने गुन्ह्याची व्याप्ती बघून मा. पोलीस अधीक्षक जालना यांनी सखोल तपास करण्या बाबतचे आदेश आर्थिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत.

मा. पोलीस अधिक्षक साहेब व अपर पोलीस अधीक्षक साहेब यांचे आदेशाने गुन्हयातील आरोपीचा शोध घेत गोपणीय माहीती अधारे व त्रांत्रीक विश्लेषणा आधारे पाठलाग करत आरोपी नामे शिरीष कमलाकर देवळे वय ५३ वर्षे, रा. महादेव मंदीर जवळ निळकंठ नगर जुना जालना हा अंबड चौफुली जवळ आज संध्याकाळी अटक करण्यात आला आहे. सादर गुन्ह्यातील इतर आरोपीतांची नावे निष्पन्न करुन आरोपीतांचा शोध सुरू आहे.

सदर कामगीरी ही मा. श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री.सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा जालना, शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजु भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

## महाराष्ट्रात आधुनिक विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्वपूर्ण निर्णय - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करून प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आल्या. कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली. याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही (१,५३,१८०), रोटाव्हायरस (६५१) अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षेत पाणी टंचाई आढावा बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसवंर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती, उपलब्ध साठे तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालीयातील नियोजन भवन येथे बैठकीत यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार सर्वश्री बबनराव लोणीकर, अर्जुनराव खोतकर, संतोष दानवे, हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य




कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कंवरिया, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांची उपस्थिती होती.

यावेळी बैठकीत जिल्ह्यातील विविध भागांतील पाणीपुरवठा योजनांची स्थितीचा आढावा घेण्यात आला. टंचाईग्रस्त गावांमध्ये तात्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विहिरी, बोअरवेल आणि जलस्रोतांचे पुनर्भरण करण्यासाठी उपाययोजना राबवण्याचे निर्देश यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच प्रशासनाला नागरिकांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून देण्याचे सांगुन पाणी वापरात काटकसरी बाळगण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. ज्या गावात पाण्याची समस्या निर्माण झाल्यास तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.यावेळी बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या जालन्यातील 'जनता दरबारास' नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील आपल्या दालनात 'जनता दरबार' घेतला. जनता दरबारात जिल्हाभरातून आलेल्या अभ्यागतांनी एकच गर्दी केली होती. यावेळी श्रीमती मुंडे यांनी आलेल्या शेकडो नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्यांच्या कामांचा जागेवरच निपटारा केला. जनता दरबारात नागरिकांनी एकट गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला. जनतेचे प्रश्न सोडवणे हे माझे कर्तव्य असल्याचे त्या म्हणाल्या.

आपल्या लाडक्या नेत्या थेट जनतेत मिसळून संवाद साधत असल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं आणि कामाचा शब्द दिला, आता आमचा प्रश्न सुटेल,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत, मनपा आयुक्त अंजली शर्मा तसेच स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.



### पर्यावरण प्रेमी स्वयंसेवी संस्थांच्या शिष्टमंडळाशी संवाद

शहरातील पर्यावरण प्रेमी नागरिक आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींशी आज त्यांनी मनमोकळा संवाद साधला. जिल्ह्यातील व शहरातील वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणविषयक बाबींचा आढावा घेतानाच, सर्वांनी मांडलेल्या सजग सूचनांचे त्यांनी स्वागत केले. आपण सर्व एकत्रित येऊन जेव्हा पर्यावरणाचा विचार करतो, तेव्हा परिवर्तनाची खरी सुरुवात होते. अशाच रचनात्मक संवादातून आणि समन्वयातून जालना जिल्हयाला अधिक समृद्ध आणि हरित बनवूया अशी ग्वाही पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी शिष्टमंडळाला दिला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**